THANE POLICE COMMISSIONERATE

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,ठाणे शहर पोलीस
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279

प्रेसनोट.क्र. दिनांक:-१२/०८/२०२५

" महामार्गावर सापळा रचुन दोन सराईत आरोपींना वाहनांसह अटक करून ३१,८४,८०,०००/- रू. किंमतीचा १५ किलो ९२४ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ जप्त करण्यात गुन्हेशाखा, घटक-०२, भिवंडीचे पथक यशस्वी."

मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांच्याकडून अंमलीपदार्थ विकी करणा-या इसमांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने दिनांक ०९/०८/२०२५ रोजी पोशि/१९९७ अमोल इंगळे व पोहवा/ २०७६ प्रशांत राणे यांना त्यांच्या गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, "दिनांक ०९/०८/२०२५ रोजी १५:०० वाजताच्या सुमारास पुर्व द्रुतगती महामार्ग नाशिक- ठाणे वाहिनीवरील रांजनोली, भिवंडी बायपास जवळ या ठिकाणी २ इसम मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमलीपदार्थ विकी करीता येणार आहेत." मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने मा. वरिष्ठांच्या आदेश व निर्देशानुसार कारवाई बाबतच्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून गुन्हे शाखा, घटक-०२, भिवंडीचे वपोनि. जनार्दन सोनवणे, सपोनि/ श्रीराज माळी, सपोनि/ मिथुन भोईर, पोउपनि रविंद्र पाटील व अंमलदारांच्या पथकाने प्राप्त बातमीच्या ठिकाणी पुर्व द्रुतगती महामार्गाच्या नाशिक- ठाणे वाहिनीवर, ओम साई फॅमिली ढाब्यासमोर रांजनोली- भिवंडी बायपास, भिवंडी येथे अचानक नाकांबदी व सापळा रचला.

सदर छापा कारवाई दरम्यान आरोपी १) तन्वीर अहमद कमर अहमद अन्सारी, वय २३ वर्षे, राह. घर क्र. २०२, गरीब नवाज बिल्डींग, दादी कॉलनी, संगम ज्वेलर्स जवळ, अमृतनगर, मुंबा, जिल्हा ठाणे यापुर्वी राह. किडवाईनगर, तलाव, स्मशानभुमी, सरदार गल्ली चाळ, शांतीनगर, भिवंडी २) महेश हिंदुराव देसाई, वय ३५ वर्षे, राह. जगे कंपाऊंड झोपडपट्टी, दिदीचा दवाखान्याजवळ, उल्हासनगर रेल्वे स्टेशनजवळ, विठ्ठलवाडी, जिल्हा ठाणे, मुळगांव शिरसंगी, पोस्ट किणे, ता.आजरा, जिल्हा- कोल्हापूर यांना त्यांच्या कडील वाहनांसह शिताफीने ताब्यात घेतले. त्यावेळी आरोपीत क.०१ तन्वीर अहमद कमर अहमद अन्सारी याच्या ताब्यात असलेले वाहन कमांक स्विफ्ट डिझायर कार नं. **एम.एच.०२-सी.पी.-३५७०** मध्ये ११ किलो ७६३ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमलीपदार्थ मिळून आला. तसेच आरोपी क.०२ महेश हिंदुराव देसाई याच्या ताब्यात असलेल्या BMW कार नंबर- **एम.एच. ०६ ए.एस.९९८१** मध्ये ०४ किलो १६१ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमलीपदार्थ मिळून आला.

वर नमुद दोन्ही अटक आरोपीकडून खालील प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१) ३१,८४,८०,०००/-रू. किंमतीचा एकुण १५ किलो ९२४ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम.डी.) अंमलीपदार्थ
२) ५,००,०००/- रु.किं.ची डिझायर कार
३) ३०,००,०००/- रु.किं.ची BMW कार
४) २२,०००/- रू किमतीचे ०३ मोबाईल फोन.
५) ८,१४०/- रू. रोख रक्कम.

३२,२०,१०,१४०/- रू एकुण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर आरोपींच्या विरोधात दिनांक १०/०८/२०२५ रोजी ०३:३७ वाजता कोनगाव पोलीस ठाणे, भिवंडी गुन्हा रजि नं ४२७/२०२५, एन.डी.पी.एस कायदा कलम ८(क), २२(क), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा, घटक -०२, भिवंडी हे करीत आहे. सदर आरोपींना मा.न्यायालयासमोर हजर केले असता दिनांक १३/०८/२०२५ पावेतो पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

अटक आरोपी **तन्वीर अहमद कमर अहमद अन्सारी** याचे विरूध्द दाखल गुन्ह्यांची माहिती खालील प्रमाणे.

१) मुंबा पोलीस ठाणे, गुन्हा रजि.नं. ११८/२०२३ भादवि ३२८,२७६,३४
२) डायघर पोलीस ठाणे,गुन्हा रजि.नं. ४९/२०२३ एन.डी.पी.एस. ८ (क), २०(ब)
३) भायखळा पो.ठाणे,मुंबई शहर गुन्हा रजि. नंबर ७८८/२०२५ एन.डी.पी.एस. ८ (क), २०(क) या गुन्ह्यात पाहिजे असलेले आरोपी आहे.

अटक आरोपी **महेश हिंदुराव देसाई** याचे विरूध्द दाखल गुन्ह्यांची माहिती खालील प्रमाणे.

१) आजरा पोलीस ठाणे, कोल्हापूर गुन्हा रजि.नंबर ३७/२०१८ भादविसंक ४७७,३८०
२) आजरा पोलीस ठाणे, कोल्हापूर गुन्हा रजि.नंबर ८४/२०१९ एन.डी.पी.एस. ८ (क),२०(अ)
३) आजरा पोलीस ठाणे, कोल्हापूर गुन्हा रजि.नंबर ०७/२०२० MCOC कायदा कलम ३ (i),(२),३(३) प्रमाणे.
४) आजरा पोलीस ठाणे, कोल्हापूर गुन्हा रजि.नंबर ८४/२०२३ भादवि.३२४,३२३, ७०४,३४ एन.डी.पी.एस. ८ (क),२०(अ

- सदर आरोपी हे नमुद अंमलीपदार्थ हा ठाणे, मुंबई परिसरात विक्री करण्यासाठी घेवून आले होते.
- यात आणखी पाहिजे आरोपीतांबाबत तपास सुरू आहे.
- सदर अंमली पदार्थ ज्या ठिकाणावरून आणला, त्याबाबत तपास सुरू आहे.
- गुन्ह्यात वापरलेली स्विफ्ट डिझायर कार ही आरोपी तन्वीर याची असून BMW कार बाबत अधिक तपास सुरू आहे.

सदरची कामगीरी ही मा.श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, मा.श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, सह पोलीस आयुक्त, मा. श्री.पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, मा.श्री.अमरसिंह जाधव, पो.उप आयुक्त, (गुन्हे), व मा. श्री.शेखर बागडे सहा. पो. आयुक्त, गुन्हे, शोध -१ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-२ भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे, सहा.पो.निरी. श्रीराज माळी, सहा.पो.निरी. मिथुन भोईर, पो.उपनिरी. रविंद्र बी.पाटील, पोलीस उप निरीक्षक राजेश शिंदे, ASI/सुधाकर चौधरी, ASI/सुनिल सांळुखे, पोहवा/६९७३ सुदेश घाग, पोहवा/४७४६ प्रकाश पाटील, पोहवा/ ७७३४ किशोर थोरात, पोहवा/८३८ साबीर शेख, पोहवा/२८१९ वामन भोईर, पोहवा/२०७६ प्रशांत राणे, पोशि/१९९७ अमोल इंगळे, पोशि/७६८९ भावेश घरत, पोशि/७७०० विजय कुंभार, पोशि/६२८३ सर्फराज तडवी, चापोशि/२०९३ रविंद्र साळुंखे, मपोहवा/६८३३ माया डोंगरे, मपोहवा/६८०० दक्षता सुतार, मपोहवा/६७४० अनुष्का पाटील यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

---------0000----------